# पेलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ३१/१२/२०२३ (रविवार)

---

## रेती चोरी करणारा आरोपीविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन खापरखेडा**:—अंतर्गत वारेगाव शिवारातील कन्हान नदीपात्र (घाट) पूर्व ५ किमी, दिनांक ३०/१२/२३ चे ०१.०० ते ०२/०० वा दरम्यान, यातील आरोपी हे वारेगाव शिवारातील कन्हान नदीचे पात्रातुन आपले ताब्यातील बोलेरो पिकअप गाडीने **रेती चोरीचा प्रयत्न** करीत असतांना, वाहन ताब्यात घेण्याकरीता गेले असता दोन्ही बोलेरो पिकअप वाहन पळून गेले, सदर वाहनाचा पाठलाग करुन आरोपी क्र.१) कृणाल सिध्दार्थ मेश्राम यांचे ताब्यातुन बोलेरो पिकअप गाडी क्र MH 40CD5838 अंदाजे किमत ५,००,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. तसेच आरोपी २) पप्पु यादव हा आपल्या ताब्यातील बोलेरो पिकअप गाडी घेवुन पसार झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे—पो.हवा प्रफुल भिकुजी राठोड पोस्टे खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे नमुद दोन्ही आरोपीविरूध्द कलम ३७९, ३४, ५११ भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा अमोल लोहकरे मो न ८६६८८३३४७७ हे करीतआहे.

## चोरी

**पोलीस स्टेशन एम आय डी सी बोरी**:—अंतर्गत मोरारजी कंपनी एमआयडीसीबोरी ०२ किमी उत्तर, सदर कंपनी दि. १७/०४/२०२३ पासुन ते दिनांक २५/१०/२०२३ पर्यत बंद होती. कंपनीचे थकीत विजबिल न भरल्यामुळे विद्युत विभागाने विजपुरवठा बंद केला होता. तसेच पाण्याचे थकीत देयकामुळे पाणी पुरवठा बंद केला होता. त्यामुळे सिसिटीव्ही कॅमेरे बंद पडलेले होते. तसेच सिक्युरीटी गार्ड यांना वेळोवेळी वेतन न मिळत असल्यामुळे ते सुध्दा कामावर येत नव्हते. दिनांक २५/१०/२०२३ रोजी कंपनी सुरू झाली असता कंपनीचे आत मधील सामान चेक केले असता, कंपनीचे खुल्या विविंग युनिट क्र. ०१ मधिल स्पेअर पार्टस, खुल्या प्रिटींग व प्रोसेस युनिट क्र. ०२ मधिल स्पेअर पार्ट, व खुल्या स्पिनिंग युनिट ०३ मध्ये कॉटन बेल हे कोणत्यातरी अज्ञात चोराने दिनांक १७/०४/२०२३ चे १०.०० वा ते दि २५.१०.२३ चे १०.०० वा दरम्यान चोरून नेले. कंपनीतील रेकॉर्ड नुसार **स्पेअरपार्ट व कॉटनबेल** ची पडताळणी केली असता **अंदाजे एकुण ३,८०,०३,०००/— रू. चा** माल चोरी गेल्याचे दिसुन येते.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—किशोर क्रिष्णाजी ढगे वय ५४ वर्ष रा. हाउसनंबर ३७२, रामनगरवार्ड हिंगणघाट जि. वर्धा मो. नं. ९७२३४५२२०४ यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे एमआयडिसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री आचरेकर हे करीत आहे.

## दुखापत

**पोलीस स्टेशन जलालखेडा**:—अंतर्गत करंजोली ०८ किमीदक्षिण. येथे यातील फिर्यादी व आरोपी हे वडिल व मुलगा असुन यांचा वाद शेती नावावर करून द्या, या कारणा वरून सुरू होता. दिनांक २९/१२/२३ ते १७.०० वा दरम्यान, फिर्यादी हा शेतात हजर असता, आरोपी ने तेथे जावुन“शेतीचा हिस्सा माझ्या नावावर करून दे” असे म्हटले, यावरून फिर्यादीने शेती तुझे नावावर करून देत नाही असे म्हटले असता, आरोपीने बाजुलाच असलेली वेळुची काठी हातात घेवुन फिर्यादीचे हातावर मारून जखमी केले

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—धनराज भिमजी धुर्वेवय ७० वर्ष रा. झोलवाडी ता.नरखेड यांचे रिपोर्टवरून आरोपी नामे—सुरेन्द्र धनराज धुर्वे वय ४५ वर्ष रा. झोलवाडीता.नरखेड याचेविरूध्द कलम ३२४ भादविचा गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोना दिनेश जोगेकर मोनं ८०८७४७८२४३ हे करीत आहे.

## विहीरीचे पाण्यात उडी घेवुन आत्महत्या

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :—अंतर्गत व्यंकटेश सिटी साईबाबा मंदिराजवळ. यातील मृतक नामे—महेन्द्र आदित्य प्रसाद ठाकुर वय ४७ वर्ष रा. रा.वार्ड नंबर ०३ व्यंकटेश सिटी शिरूळ ता हिंगणा जि नागपुर हे **मागील सहा महिन्यापासुन कॅन्सर या आजाराने ग्रसीत असु**न सदर मृतक हा दि.२९.१२.२३ रोजी सकाळी १०.०० वा दरम्यान बाहेरून फिरून येतो, असे सांगुन घरून निघुन गेला होता, दि.३०.१२.२३ रोजी सकाळी ०७.०० वा दर सदर मृतकाने मौजा व्यंकटेश सिटीशिरूळ **साई मंदिर चे विहिरीचे पाण्यात उडी घेवुन आत्महत्या** केली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे—जितेंद्र आदित्य प्रसाद ठाकुर वय ४२ वर्ष रा.वार्डनंबर ०३ व्यंकटे शसिटी शिरूळता हिंगणा जि नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे कलम १७४ जाफौ अन्वयें मर्ग दाखल करण्यात आला. सदर मर्ग चा पुढील तपास—जीपीएसआय मुन्नासिंग ठाकुर मो.न.८८८८८६२२५७ हेकरीतआहे

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मोक्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**